

**कोल्हापूर : डॉ. मेघा पानसरे, किरण गुरव यांचा विद्यापीठ प्रशासनातर्फे गौरव करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, गजानन पळसे, व्ही. टी. पाटील, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. भारती पाटील.**

# वाङ्मय पुरस्कारांमुळे विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा : कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. मेघा पानसरे व किरण गुरव यांच्या साहित्यकृतींना राज्य शासनाचे वाङ्मय पुरस्कार मिळाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे, अशी भावना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी देण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार-२०१८ नुकतेच जाहीर करण्यात आले. त्यात डॉ. पानसरे आणि गुरव यांच्या साहित्यकृतींना पुरस्कार जाहीर झाले. त्यानिमित्त त्यांचा विद्यापीठ प्रशासनातर्फे गौरव करण्यात आला. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठातील दोन सहकाऱ्यांना एकाच वेळी राज्यस्तरीय प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त होण्याला विशेष महत्त्व आहे. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, लेखनासारख्या सर्जनशील प्रांतामध्ये विद्यापीठातील सहकारी दमदार व लक्षणीय कामगिरी करीत आहेत, ही कौतुकास्पद बाब आहे.

जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## सचिन कुलकर्णी : शिवाजी विद्यापीठात वरुटे स्मृती व्याख्यानमाला

# नियंत्रित वजन हाच आरोग्य समस्यांवरचा उपाय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : दहावी-बारावीच्या परीक्षांच्या कालखंडात मानसिक ताणतणाव, शारीरिक श्रम कमी होणे, हालचालींचा अभाव आणि बसल्या जागी खाणे यांचा परिणाम आरोग्याच्या समस्या उद्‌भवण्यात होतो. मुलींमध्ये वजन वाढल्याने समस्या निर्माण होतात. त्यामुळे वजन नियंत्रणात राखणे हाच या सर्व समस्यांवरचा महत्त्वाचा उपाय आहे, असे प्रतिपादन प्रिस्टीन महिला हॉस्पिटलमधील वंध्यत्व व आयव्हीएफ तज्ज्ञ डॉ. सचिन कुलकर्णी यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. आप्पासाहेब तानसेन वरुटे स्मृती व्याख्यानमालेमध्ये ते बोलत होते. त्यांनी 'तरुण महिलांमधील प्रजननविषयक सर्वसाधारण समस्या आणि आयव्हीएफ तंत्रज्ञान' या विषयावर मार्गदर्शन केले. प्राणिशास्त्र अधिविभागाच्या सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंतरविद्याशाखा विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत होते. डॉ. कुलकर्णी म्हणाले, जीवनशैलीमध्ये पूरक बदल आणि योग्य आहार व नियमित व्यायामाने वजन कमी करणे या बाबींच्या सहाय्याने महिलांना पॉलिसिस्टीक ओव्हरियन आजारांवर (पीसीओडी) मात करता येते. स्त्री-पुरुषांतील शारीरिक व लैंगिक बदल हे नैसर्गिक आहेत. त्याविषयी मनामध्ये विनाकारण गैरसमज आणि संकोच बाळगण्याची गरज नाही. या कार्यक्रमास डॉ. ए. डी. जाधव, एम. व्ही. वाळवेकर, एन. ए. कांबळे, एस. आर. यनकंची, ए. ए. देशमुख,आदी उपस्थित होते. समन्वयक डॉ. एस. एम. गायकवाड यांनी स्वागत केले. अधिविभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी परिचय करून दिला.

### अभ्यासक्रम सुरु करणे आवश्यक

महिला आणि पुरुष या दोघांमध्येही जीवनशैलीशी निगडित वंध्यत्व समस्या दिसून येतात. त्यावर वैद्यकीय शास्त्राने उपाय शोधून दिले आहेत. पण, केवळ जीवनशैली बदलून सुद्धा त्यावर मात करता येते. एम्ब्रियॉलॉजी या ज्ञानशाखेचा एखादा लघु अभ्यासक्रम विभाग सुरु करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. राऊत यांनी सांगितले.

# जीवनशैलीत पूरक बदलांनी 'पीसीओडी'वर निश्‍चितपणे मात शक्य : डॉ. कुलकर्णी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जीवनशैलीमध्ये पूरक बदल व योग्य आहार, नियमित व्यायामाने वजन कमी करणे या बाबींच्या सहाय्याने महिलांना पॉलिसिस्टिक ओव्हरियन आजारांवर (पीसीओडी) निश्‍चितपणे मात करता येते, असे प्रतिपादन येथील प्रिस्टिन महिला हॉस्पिटलचे वंध्यत्व व आयव्हीएफतज्ज्ञ डॉ. सचिन कुलकर्णी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'डॉ. आप्पासाहेब वरुटे स्मृती व्याख्यानमालेत 'तरुण महिलांमधील प्रजननविषयक सर्वसाधारण समस्या व आयव्हीएफ तंत्रज्ञान' या विषयावर व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आंतरविद्याशाखा विद्याशाखेचे अधिष्ठता डॉ. पी. डी. राऊत होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, स्त्री-पुरुषांतील शारीरिक व लैंगिक बदल नैसर्गिक आहेत. त्याविषयी मनामध्ये विनाकारण गैरसमज आणि संकोच बाळगण्याची गरज नाही. वाढलेले वजन आणि मासिक पाळी यांचा थेट संबंध आहे, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. एस. एम. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी परिचय करून दिला. डॉ. एम. पी. भिलावे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. ए. डी. जाधव, डॉ. एम. व्ही. वाळवेकर, डॉ. एन. ए. कांबळे आदी उपस्थित होते.

## ज्योती शेट्ये : शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागातील व्याख्यान

# महिलांवरील अत्याचार चिंताजनक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महिलांवर होणारे अत्याचार चिंताजनक आहेत. केवळ कायदे करून हा प्रश्न सुटणार नाही. कायद्याबरोबरच कुटुंबातील संस्कार आणि मूल्यशिक्षणावर भर देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महिलांसंदर्भातील कायद्याच्या अभ्यासक ज्योती शेट्ये यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्यावतीने आयोजित व्याख्यानात त्यांनी 'महिला अत्याचार प्रतिबंधक कायदे' या विषयावर मार्गदर्शन केले.



**शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्यावतीने आयोजित व्याख्यानात ज्योती शेट्ये यांनी मार्गदर्शन केले.**

अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा पवार होत्या. या कार्यक्रमास डॉ. सुमेधा साळुंखे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

### शिक्षणव्यवस्थेत मूल्यशिक्षण गरजेचे

ज्योती शेट्ये म्हणाल्या, महिलांना कायद्याचे संरक्षक कवच आहे. महिला व मुलींवरील अत्याचार थांबावेत यासाठी महाविद्यालये, विद्यापीठे तसेच अन्य संस्थांमध्येही अनेक उपाययोजना केल्या आहेत. एवढे करुनही समाजात महिला असुरक्षित आहेत. केवळ कायदे केले म्हणून हा प्रश्न निकालात निघेल, असे नाही. यासाठी कुटुंबापासून त्याची सुरुवात होणे आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी असा भेद करणे सर्वप्रथम थांबले पाहिजे. मुलीला समान दर्जा मिळत नाही, तोवर या प्रश्नाची तीव्रता कमी होणार नाही. महिलांना आदराचे स्थान मिळवून देण्यासाठी कायद्यापेक्षा मूल्यशिक्षण प्रभावी भूमिका बजावू शकेल. यासाठी प्रत्येक टप्प्यावर शिक्षणव्यवस्थेत मूल्यशिक्षणाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे.

# विद्यापीठात सोमवारपासून 'ओरिगामी' कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ भाषा विभागाच्या वतीने दि. २४ व २५ रोजी वि. स. खांडेकर भाषा भवन येथे 'कार्निव्हल'चे आयोजन करण्यात आले आहे.

कार्निव्हलअंतर्गत २४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत 'ओरिगामी' कार्यशाळा होणार आहे. ओरिगामी ही एक प्रसिद्ध जपानी कला असून चित्रकार अर्चना देसाई ओरिगामीचे प्रात्यक्षिके करून दाखविणार आहेत. यावेळी कागदी कलावस्तू बनवण्याचे कौशल्य शिकवले जाणार आहे. कार्यशाळेसाठी सर्वांना मोफत प्रवेश आहे.

कार्यशाळेत निर्मिती केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागाच्या वतीने डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.